# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा विभाग

## // प्रेस नोट //

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मागील काही दिवसात पाणी टंचाईची समस्या निर्माण झाली आहे. सदर समस्येचे निवारण करण्याकरीता दिनांक २१ ऑक्टोबर २०२१ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका मा. स्थायी समिती सभागृहात आयुक्त दिलीप ढोले यांच्या अध्यक्षतेखाली मा. महापौर जोत्स्ना हसनाळे, मा. उपमहापौर हसमुख गेहलोत, मा. सभागृह नेता प्रशांत दळवी, माजी आमदार नरेंद्र मेहता तसेच भारतीय जनता पक्षाचे सर्व नगरसेवक व पदाधिकारी यांच्या उपस्थितीत पाणी समस्या निवारण व उपाययोजना करणेबाबत आढावा बैठक घेण्यात आली. प्रसंगी पोलीस उपायुक्त अमित काळे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) मुख्य अभियंता सुधाकर वाघ, स्टेम वॉटर डिस्ट्रीब्युशन अॅन्ड इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी प्रा.लि. (STEM) प्राधिकरण व्यवस्थापक संचालक संकेत घरत, अतिरिक्त आयुक्त संभाजी पानपट्टे, शहर अभियंता शिवाजी बारकुंड, कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) सुरेश वाकोडे, उपअभियंता शरद नानेगांवकर उपस्थित होते. तद्नंतर आयुक्त दिलीप ढोले यांच्या अध्यक्षतेखाली आयुक्त दालनात मा. आमदार गीता जैन, विरोधी पक्षनेता प्रवीण पाटील, गटनेता निलम ढवण, जुबेर इनामदार, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रतिनिधी तसेच वरील सर्व अधिकारी यांच्या उपस्थितीत पाणी समस्या निवारण व उपाययोजना करणेबाबत आढावा बैठक घेण्यात आली.

मिरा-भाईंदर शहरास स्टेम वॉटर डिस्ट्रीब्युशन अॅन्ड इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी प्रा.लि. (STEM) प्राधिकरणामार्फत 86.00 द.ल.ली. पाणी प्रती दिन नियमित पुरवठा करण्याचे मंजूर आहे. स्टेम प्राधिकरणाची पाणी पुरवठा करणारी जलवाहीनी अंदाजे 30 वर्षे जुनी असून त्यांच्यामार्फत सदर जलवाहीनी अद्यावत करण्याचे काम सुरु आहे. मिरा-भाईंदर शहरामधील वितरण व्यवस्थेमध्ये कोणताही भेदभाव न होता समान तत्वावर झोन निहाय पाणी पुरवठा केला जातो. जलवाहीनीचा शटडाऊन अथवा ब्रेकडाऊन झाल्यास जितक्या कालावधीकरीता शहराचे पाणी बंद होते त्या कालावधीमध्ये बंद असलेल्या पाण्याची भरपाई पाणी सुरु झाल्यानंतर संबंधित प्राधिकरण करणार आहेत. ज्या प्राधिकरणाच्या जलवाहीनीमध्ये बिघाड होऊन पाणी पुरवठा खंडीत झाल्यास समांतर प्राधिकरणाने त्यांच्या मंजूर कोट्याव्यतिरिक्त अतिरिक्त पाणी पुरवठा शहरास करून सहकार्य करणेच्या सुचना दिल्या आहेत. स्टेम प्राधिकरण व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) यांच्या वितरण व्यवस्थेवर वेळोवेळी पहाणी करणेकरीता वरिष्ठ अधिकाऱ्यांची समिती लवकरच नियुक्त करण्यात येणार आहे. स्टेम प्राधिकरणामार्फत वारंवार वीज पुरवठा खंडीत होऊन बऱ्याचदा मिरा-भाईंदर शहराचा पाणी पुरवठा खंडीत होतो. याकरीता स्टेम प्राधिकरणामार्फत

अंडरग्राऊंण्ड स्टँण्डबाय एक्सप्रेस फिडर केबल्स टाकण्याचे काम तात्काळ हाती घेण्यात येणार आहे. मिरा-भाईंदर शहरास प्रतिदिन 120 ते 125 द.ल.ली. पाणी पुरवठा करण्यात यावा असे निर्देश आयुक्त यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC)च्या अधिकाऱ्यांना आजच्या बैठकीत देण्यात आले. पावसाळ्यात पंम्पात कचरा अडकून पंम्प बंद पडतो त्याकारणाने रॉ वॉटर चॅनेलवर स्क्रीन बसविणेच्या सुचना देण्यात आल्या. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC)च्या अधिकाऱ्यांनी त्याची तात्काळ अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडाळ (MIDC) मार्फत जांभूळ येथे पंम्प बसविण्याचे काम हाती घेण्यांत आले आहे. तसेच कटई नाका ते शिळफाटा या दरम्यान नवीन जलवाहीनी अंथरण्याचे काम सुरु आहे. सदर काम पुर्ण होईपर्यंत अंतरजोडणी कामाकरीता जितके शटडाऊन लागणार आहेत त्या शटडाऊन दरम्यान मिरा-भाईंदर महानगरपालिका महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडाळ (MIDC) च्या मनुष्यबळाव्यतिरिक्त स्वत:चे अतिरिक्त मनुष्यबळ पुरवून काम पुर्ण करणेस मदत करून एकुण शटडाऊनची संख्या कमी करता येईल. सर्व धर्मियांचे डिसेंबर 2021 अखेरपर्यंत सण असल्यामुळे कोणताही शटडाऊन न घेण्याच्या सुचना आयुक्तांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडाळ (MIDC) व स्टेम प्राधिकरणाला दिल्या आहेत.

मिरा भाईंदर व वसई-विरार महानगरपालिकेसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत 403 द.ल.ली. पाणी पुरवठा राबविण्यांत येणार आहे. या योजनेंतर्गत मिरा भाईंदर शहरास 218 द.ल.ली. पाणी उपलब्ध होणार आहे. यासाठी सुर्या धरणापासून मिरा भाईंदर शहरापर्यंत एकूण 98 कि.मी. लांबीची जलवाहिनी तसेच चेणे येथे वनखात्याच्या जागेत 48 द.ल.ली. क्षमतेची मुख्य संतुलन टाकी बांधून चेणे येथील टाकीपर्यंत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण 218 द.ल.ली. पाणी पुरवठा करणार आहे.

पुन:श्च एकदा आयुक्त यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडाळ (MIDC)च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना मिरा-भाईंदर शहरास प्रतिदिन 110 द.ल.ली. व स्टेम वॉटर डिस्ट्रीब्युशन ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी प्रा.लि. (STEM) प्राधिकरणाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांस प्रतिदिन 86.00 द.ल.ली. पाणी पुरवठा करण्याच्या सुचना दिल्या आहेत.